**विशेष दिवाणी दावा क्र. १४८/२०२१**

निशाणी ५३

**(सदर साक्ष न्यायालयाच्या टी.व्ही वर प्रक्षेपित करण्यात आली.)**

नाव:- अशितोष भाउसाहेब वायकर

वय:- ३५ वर्षे

व्यवसाय:- ग्राम महसूल अधिकारी, पनवेल

पत्ता:- पनवेल, करंजाडे

**(वादी तर्फे विधिज्ञ वकिल श्री. विलास माळी यांचेमार्फत वादी तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा पुढील सरतपास शपथेवर सुरू....)**

आता मला निशाणी ३४ सोबत असलेले फेरफार क्र. २९३६ दि. २७/१२/२०२४ चे कबुली संचिका दाखविण्यात आली. मला न्यायालयाचे साक्षीसमन्स अन्वये फेरफार क्र. २१४३ व २९३६ ची कबुली जबाब संचिका आणण्यास सांगितले होते. तसे मी आजरोजी दोन्ही मुळ संचिका आणलेल्या आहेत. आता मला निशाणी ३४ सोबत असलेले फेरफार क्र. २९३६ दि. २७/१२/२०२४ चे कबुली संचिका दाखविण्यात आली. ती आमच्या कार्यालयातून मी स्वत: प्रमाणित प्रत करून दिलेले आहे. प्रमाणित प्रत मुळ प्रतिप्रमाणे बरोबर आहे. त्यास **निशाणी ५४** देण्यात येत आहे. कबुली संचिका मध्ये वादी यांचा सत्यप्रतिज्ञापत्र व जबाब लिहून घेतला होता. तसा पंचनामा देखील केला होता. तसेच पंचनाम्यावर आठ जणांच्या समक्ष म्हणून सहया घेतल्या आहेत. तसेच इतर लागणारे कागदपत्र देखील लावलेले आहेत. मृत्यूचा दाखला नसल्यामुळे तसे प्रतिज्ञापत्र देखील जोडलेले आहे. मी स्वत: समक्ष म्हणून कबूल संचिकेवर सही केलेली आहे. आता मला फेरफार क्र. २१४३ ची कबुली जबाब संचिकाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. ते आमच्या कार्यालयामधून देण्यात आलेली आहे. त्याची मुळ प्रत मी आजरोजी न्यायालयात आणलेले असून प्रमाणित प्रतमधील मजकूर मुळ प्रतीप्रमाणेच आहे. त्यास **निशाणी ५५** देण्यात येत आहे. सदरचे फेरफार सिताराम काळु आरविले यांच्या मिळकतीसंदर्भात आहे. त्यासंदर्भात जबाब व पंचनामा तलाठी यांनी केलेला आहे. तसेच पाच जणांच्या साक्षीदार म्हणून सहया आहेत.

**सरतपास संपला.**

**प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे विधिज्ञ वकिल श्री. योगेश गोरे यांचेमार्फत वादी तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा उलटतपास शपथेवर सुरू....)**

उलटतपास नाकारला.

**विशेष दिवाणी दावा क्र. १४८/२०२१**

**प्रतिवादी क्र. ३ तर्फे विधिज्ञ वकिल श्री. एस.के. राणे यांचेमार्फत वादी तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा उलटतपास शपथेवर सुरू....)**

निशाणी ५४ आणि ५५ च्या सत्यप्रती मी स्वत: दिलेल्या आहेत. सत्यप्रत देतेवेळेस प्रथमत: अर्ज येतो व त्या अर्जाला नंबर पडतो. ज्या सत्यप्रत दिलेल्या आहेत त्यावर अर्ज कधी आला, त्याचा क्रमांक व ते कधी सत्यप्रत देण्यात आले तसा मजकूर लिहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे कोणताही अर्ज आलेला नसतांना माझ्या वैयक्तीक अधिकारामध्ये मी सदरचे सत्यप्रती वादी यांना दिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे त्या कागदपत्रांच्या प्रती मिळाव्या म्हणून माहितीच्या आधारान्वये अर्ज आले होते. हे मला सांगता येणार नाही की, माहितीच्या अधिकारा अंतर्गत मिळालेली कागदपत्र यावर असा शिक्का असतो की सदरची कागदपत्रे न्यायालयीन कामकाज किंवा पुराव्यासाठी वापरता येणार नाही असे असते किंवा कसे. मला माहिती अधिकार अंतर्गत माहिती पुरविण्याचे अधिकार आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माहितीच्या अधिकारअंतर्गत मागविलेल्या माहितीचे सत्यप्रती करण्याचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणताही अधिकार नसतांना आजरोजी साक्ष देण्यात आलो व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती

UMA YASH BORADE KAPOOR

Digitally signed by UMA YASH BORADE KAPOOR
Date: 2026.03.30 11:14:39 +0530

दि. २७/०३/२०२६

**(उमा वाय. बोराडे -कपूर)**

४ थे सहदिवाणी न्यायाधीश व स्तर, पनवेल